**समक्ष अध्यक्ष, मोटार अपघात प्रकरणे न्यायाधिकरण, वर्धा**
**एम.ए.सी.पी (एम.ए.एन.आर.जे.आय.) क्र. ६०/२०२६**
**मिना अविनाश चांभारे व ३ –वि.– निरंक**
**आदेश नि. क्र. १ वर पारित**
**दिनांक २४/०७/२०२६**

मोटार अपघात दावा प्रकरण क्र. ०८/२०२४ दिनांक ३१/०१/२०२६ रोजी निकाली काढण्यात आले. सदर प्रकरणातील आदेशानुसार गैरअर्जदार न्यु इंडिया इंश्युरन्स कंपनी यांनी रक्कम रुपये १९,२८,७५८/- (अक्षरी रूपये एकोनविस लाख अठ्ठावीस हजार सातशे अठ्ठावन फक्त) न्यायालयात जमा केली आहे, ती रक्कम मिळण्याकरीता मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. १ मिना अविनाश चांभारे, अर्जदार क्र. २ समिर अविनाश चांभारे, अर्जदार क्र. ३ निकीता अविनाश चांभारे व अर्जदार क्र. ४ कौशल्याबाई उत्तमराव चांभारे यांनी त्यांचे हिश्याची रक्कम मिळण्याकरीता सदर अर्ज केलेला आहे.

सदर प्रकरणात मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. ३ निकीता अविनाश चांभारे हिने दाखल केलेल्या तिच्या आधारकार्ड नुसार तिची जन्मतारीख ०६/०१/२००८ आहे यावरुन ती आज रोजी १८ वर्षाची झाल्याचे दिसुन येते.

उपरोक्त मोटार अपघात प्रकरण ०८/२०२४ मधे अर्जदाराने अर्जात नमुद केलेली रक्कम रुपये १९,२८,७५८/- (अक्षरी रूपये एकोनविस लाख अठ्ठावीस हजार सातशे अठ्ठावन फक्त) ही U.T.R. No. AXISCN1375771622 दिनांक १५.०६.२०२६ नुसार जमा असुन सदर रक्कम R-15/2026 दिनांक ३०/०६/२०२६ नुसार जमा असल्याबाबतचा अहवाल नि. क्र. ५ अन्वये वरिष्ठ लिपीक (मोटार अपघात), रोख व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, वर्धा यांनी दिलेला आहे.

प्रकरणांतील निकालाचे आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालयात अपील झालेले नाही अथवा स्थगनादेश नाही असा अहवाल संबंधित लिपीक यांनी दिलेला आहे. मुळ अभिलेखाची पडताळणी केली असता अर्जदाराने

प्रकरणांत आवश्यक असलेली कोर्ट फी भरली आहे. करीता मुळ प्रकरणातील आदेशानुसार अर्जदार क्र. १ ते ४ यांना खालील अटी व शर्तीवर रक्कम देणे योग्य होईल.

करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. मुळ प्रकरणातील आदेशानुसार अर्जदार क्र. १ मिना अविनाश चांभारे यांना U.T.R. No. AXISCN1375771622 मधे जमा असलेली रक्कम रू. १९,२८,७५८/- (अक्षरी रूपये एकोनविस लाख अठ्ठावीस हजार सातशे अठ्ठावन फक्त) पैकी त्यांचे हिश्याची रक्कम रुपये ५,८६,०७०/- (अक्षरी रूपये पाच लाख शहाऐंशी हजार सत्तर फक्त) एवढी देण्यात यावी. त्यापैकी रक्कम रुपये २,००,०००/- (अक्षरी रूपये दोन लाख फक्त) तिन वर्षाकरीता अर्जदार मिना अविनाश चांभारे हिचे नावे तिचे सांगण्याप्रमाणे कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेत मुदत ठेवीमधे ठेवण्यात यावे. अर्जदार क्र.१ यांना त्यांची इच्छा असल्यास सदर मुदत ठेवीच्या रकमेवर जमा झालेले व्याज त्रैमासिक काढण्याची मुभा असेल. उर्वरीत रक्कम रुपये ३,८६,०७०/- (अक्षरी रूपये तिन लाख शहाऐंशी हजार सत्तर फक्त) तिचे खात्यात पडताळणीअंती प्रदान करण्यांत यावी.

२. मुळ प्रकरणातील आदेशानुसार अर्जदार क्र. २ समिर अविनाश चांभारे यांना U.T.R. No. AXISCN1375771622 मधे जमा असलेली रक्कम रू. १९,२८,७५८/- (अक्षरी रूपये एकोनविस लाख अठ्ठावीस हजार सातशे अठ्ठावन फक्त) पैकी त्यांचे हिश्याची रक्कम रुपये ५,२७,४६४/- (अक्षरी रूपये पाच लाख सत्तावीस हजार चारशे चौसष्ट फक्त) एवढी देण्यात यावी. त्यापैकी रक्कम रुपये २,००,०००/- (अक्षरी रूपये दोन लाख फक्त) तिन वर्षाकरीता अर्जदार समिर अविनाश चांभारे यांचे नावे त्यांचे सांगण्याप्रमाणे कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेत मुदत ठेवीमधे ठेवण्यात यावे. अर्जदार क्र.२ यांना त्यांची इच्छा असल्यास सदर मुदत ठेवीच्या रकमेवर जमा झालेले व्याज त्रैमासिक काढण्याची मुभा असेल. उर्वरीत रक्कम रुपये ३,२७,४६४/- (अक्षरी रूपये तिन लाख सत्तावीस हजार चारशे चौसष्ट फक्त) त्याचे खात्यात पडताळणीअंती प्रदान करण्यांत यावी.

३. मुळ प्रकरणातील आदेशानुसार अर्जदार क्र. ३ निकीता अविनाश चांभारे यांना U.T.R. No. AXISCN1375771622 मधे जमा असलेली रक्कम रू.

१९,२८,७५८/- (अक्षरी रूपये एकोनविस लाख अठ्ठावीस हजार सातशे अठ्ठावन फक्त) पैकी त्यांचे हिश्याची रक्कम रुपये ५,२७,४६४/- (अक्षरी रूपये पाच लाख सत्तावीस हजार चारशे चौसष्ट फक्त) एवढी देण्यात यावी. त्यापैकी रक्कम रुपये २,००,०००/- (अक्षरी रूपये दोन लाख फक्त) तिन वर्षाकरीता अर्जदार निकीता अविनाश चांभारे यांचे नावे त्यांचे सांगण्याप्रमाणे कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेत मुदत ठेवीमधे ठेवण्यात यावे. अर्जदार क्र.२ यांना त्यांची इच्छा असल्यास सदर मुदत ठेवीच्या रकमेवर जमा झालेले व्याज त्रैमासिक काढण्याची मुभा असेल. उर्वरीत रक्कम रुपये ३,२७,४६४/- (अक्षरी रूपये तिन लाख सत्तावीस हजार चारशे चौसष्ट फक्त) तिचे खात्यात पडताळणीअंती प्रदान करण्यांत यावी.

४. मुळ प्रकरणातील आदेशानुसार अर्जदार क्र. ४ कौशल्याबाई उत्तमराव चांभारे यांना U.T.R. No. AXISCN1375771622 मधे जमा असलेली रक्कम रू. १९,२८,७५८/- (अक्षरी रूपये एकोनविस लाख अठ्ठावीस हजार सातशे अठ्ठावन फक्त) पैकी त्यांचे हिश्याची रक्कम रुपये २,८७,७६०/- (अक्षरी रूपये दोन लाख सत्याऐंशी हजार सातशे साठ फक्त) एवढी देण्यात यावी. त्यापैकी रक्कम रुपये १,००,०००/- (अक्षरी रूपये एक लाख फक्त) दोन वर्षाकरीता अर्जदार कौशल्याबाई उत्तमराव चांभारे यांचे नावे त्यांचे सांगण्याप्रमाणे कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेत मुदत ठेवीमधे ठेवण्यात यावे. अर्जदार क्र. ४ यांना त्यांची इच्छा असल्यास सदर मुदत ठेवीच्या रकमेवर जमा झालेले व्याज त्रैमासिक काढण्याची मुभा असेल. उर्वरीत रक्कम रुपये १,८७,७६०/- (अक्षरी रूपये एक लाख सत्याऐंशी हजार सातशे साठ फक्त) त्यांचे खात्यात पडताळणीअंती प्रदान करण्यांत यावी. याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येतो.

HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD

Digitally signed by HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Date: 2026.07.24 18:11:03 +0530

(हिमंत भ. गायकवाड)

दिनांक: २४/०७/२०२६

अध्यक्ष,
मोटार अपघात प्रकरण न्यायाधिकरण,वर्धा